Reg. No. NPCITY/236/2018-20

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक १२ ] मंगळवार, डिसेंबर २०, २०२२/अग्रहायण २९, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-नागपूर विभागीय पुरवणी

**संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.**

भाग १ (असा.) (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १९.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३**

क्र.अ.का.-उविअभं-भुसं.अ.२०१३-कावि-७७४-२०२२.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३० वा) (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना क्रमांक सिरस्ते-उविअभं-भुसं-कलि-कावि-४५२-२०२१, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढण्यात आलेली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये आधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनूसूची-दोनमध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटलेली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी “ पुनर्वसाहत क्षेत्र ” म्हणून निर्धारीत केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, भंडारा यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन मामला क्रमांक १-अ-६५-२०२१-२२, मौजा वलनी, त.सा.क्र. २२, तालुका-पवनी, जिल्हा भंडारा.

| अनुक्रमांक | सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ५५२ | ० ३७ |
| २ | ६१४/३ | ० ०४ |
| ३ | ७८६ | ० ०९ |
| ४ | ७८५ | ० १० |
| ५ | ७८४ | ० ११ |
| ६ | ७८१ | ० १३ |
| ७ | ७७८ | ० १३ |
| ८ | ७७३ | ० १३ |
| ९ | ७११ | ० ०४ |
| १० | ७१२ | ० २३ |
| ११ | ७१३ | ० १३ |
| १२ | ७१४ | ० ११ |
| १३ | ७१५ | ० १३ |
| १४ | ७१६ | ० १३ |
| १५ | ५२९/१ | ० ०८ |
| १६ | ५६९ | ० १२ |
| १७ | ५६८ | ० ११ |
| १८ | ५६६ | ० ०४ |
| १९ | ५६५ | ० ०९ |
| २० | १२२ | ० २० |
| २१ | १२३ | ० १६ |
| २२ | ११२ | ० ०१ |
| २३ | ११३ | ० २२ |
| २४ | ७३ | ० १३ |
| २५ | ८० | ० ०८ |
| | एकूण क्षेत्र . . | ३ ११ |

**अनुसूची—दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | गोसीखुर्द प्रकल्प |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | गोसीखुर्द डावा कालवा अंतर्गत शाखा कालवा क्र. २, वरून निघणारा पौना खुर्द लघुकालवा व उपलघु कालवा तसेच आसगाव वितरीकेच्या आसगाव लघु कालवा क्र. ४, वरील उपलघु कालव्याचे बांधकामाकरीता. |
| समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात) | :— | गोसीखुर्द प्रकल्पाद्वारे सिंचन, पिण्यासाठी पाणी पुरवठा, औद्योगिक पाणी पुरवठा, मस्त्य व्यवसाय व जलविद्युत निर्मिती. |

**अनुसूची—तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

—निरंक—

**अनुसूची—चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

—निरंक—

**टीप :–**उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी, भंडारा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता यईल.

भंडारा :
दिनांक ७ डिसेंबर, २०२२.

**योगेश कुंभेजकर,**
जिल्हाधिकारी, भंडारा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.